Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 5, December 2023; Pages 50 – 55

DOI: 10.5281/zenodo.10072372

Original Research Article

# महात्मा गांधींची विश्वस्त संकल्पना : एक ऐतिहासिक विवेचन

प्रा. डॉ. क्षिरसागर बी. एस.

विभाग प्रमुख, इतिहास विभाग, शिवाजी महाविद्यालय हिंगोली जि. हिंगोली ४३१५१३ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: drkbs003@gmail.com

Received: 07 October, 2023 | Accepted: 23 October, 2023 | Published: 26 October, 2023

## प्रस्तावना

आधुनिक जगाच्या इतिहासात बहुसंख्य लोकांना आपल्या विचार व तत्वांनी भारावून टाकणारे एकमेव व्यक्तिमत्व म्हणजे मोहनदास करमचंद गांधी होय. स्वावलंबी, सन्मानाने जगण्याचा अधिकार नैसर्गिकरित्या सर्वांना आहे, तो सर्वसामान्यांना मिळावा यासाठी तहयात महात्मा गांधींनी प्रस्थापित परिस्थितीशी लढा दिला. जगाला बुद्धानंतर शांती व अहिंसेचा विचार देणारे महात्मा गांधी एकमेव आहेत. म्हणूनच 2 ऑक्टोंबर 2007 ला संयुक्त राष्ट्रसंघातील 191 राष्ट्रांनी एकमताने ठराव मंजूर करून, संयुक्त राष्ट्रसंघाच्या प्रत्येक राष्ट्रांमध्ये 2 आक्टोंबर हा दिवस जागतिक शांतता दिवस किंवा अहिंसा दिवस म्हणून 2 ऑक्टोबर 2007 पासून सर्वत्र हा महात्मा गांधी यांचा जन्मदिवस साजरा करन्यात येतो. सत्याग्रह, सहकार आणि अहिंसेचा योग्य वापर करून काळावर आपली मुद्रा कोरणारा जगात एकमेव माणूस होऊन गेला. तो म्हणजे महात्मा गांधी. प्रसिद्ध तत्त्ववेत्ते अल्बर्ट आईन्स्टाईन म्हणतात... जगाला विसाव्या शतकाने दोन सामर्थ्यशाली गोष्टी दिल्या. एक अणुबॉम्ब आणि दुसरी महात्मा गांधी. अणुबॉम्ब हे विध्वंसांचे, प्रलयाचे, सर्वनाशाचे प्रतीक. तर गांधी हे निर्मितीचे, विधायकतेचे व शांततेचे प्रतीक. खरे म्हणजे महात्मा गांधींचे शरीर मारले जाऊ शकते, परंतु विचार मारले जाऊ शकत नाही. हे काळाने सिद्ध केले आहे. "बोले तैसा चाली त्याची वंदावी पाऊले", या संत तुकारामाच्या वचनाशी गांधी सदैव एकरूप होते. आपल्या आचरणात न येणारी एकही बाब गांधी बोलत नव्हते. एवढेच काय शब्दाच्या चार पावले त्यांची कृती असे. महात्मा गांधी म्हणजे कृतिशील श्रद्धेची मूर्ती, शाश्वताचा, लोकसेवेचा प्रवाह होय. सत्य आणि अहिंसा या दोन तत्त्वावर आधारित गांधीवाद आहे. गांधी म्हणजे वैचारिक दृष्टीने चालते बोलते विद्यापीठ होते. महात्मा गांधी म्हणजे एक हाडामासाचा व्यक्ती असे व्यक्तिमत्व नव्हे, तर संपूर्ण जगाला शांततेचा आणि

समृद्धीचा मार्ग दाखविणारे मार्गदर्शक होते. आजही भारतामध्ये जात-पात पृश्य-अस्पृश्यता मोठ्या प्रमाणात पाळली जाते. तसेच मोठ्या प्रमाणात प्रादेशिकवाद, भाषावाद, आर्थिक विषमता दिसून येते. या सर्वांच्या परिणामामुळे देशात नक्षलवाद व दहशतवाद फोफावत आहे. यामुळे भारतीय राष्ट्रीय एकात्मतेला, अखंडतेला मोठा धोका निर्माण झाला आहे. या सर्व समस्या सोडविण्याकरिता शाश्वत आणि विश्वासच असा मार्ग गांधीवादी विचारांमध्ये दिसून येतो. शाश्वत आणि विश्वासच विकास साधण्यासाठी गांधी विचारातील "विश्वस्त संकल्पना" हेच खऱ्या दृष्टीने "चिरंतन मूल्य" आहे. हे मूल्य सर्वांमध्ये रूजल्याशिवय सर्वोदय होणे अशक्य आहे.

**महात्मा गांधींची विश्वस्त संकल्पना**

महात्मा गांधींनी सर्व मानवाच्या व राष्ट्र उद्धारासाठी आवश्यक ती विचारधारा सर्वसामान्यांमध्ये रुजविण्याचे कार्य केले. या विचारधारेच्या मुळाशी सर्वोदय आणि विश्वस्त संकल्पना आहे. कारण जोपर्यंत विश्वस्त विचार अंतकरणात रुजणार नाही, तोपर्यंत सर्वोदय शक्य नाही. सर्वांचा उदय किंवा सर्वांचे कल्याण हा विचार रुजविल्याशिवाय प्रत्येकाच्या हाताला काम, पुरेशी अन्न, वस्त्र व निवारा मिळण्याची खात्री नाही. म्हणूनच गांधींनी विश्वास्ताची संकल्पना मांडली आहे. महात्मा गांधी यांची विश्वस्त संकल्पना ही आर्थिक विचारत मोडणारी आहे. आर्थिक विषमता नष्ट करण्यासाठी विश्वस्ताचा विचार स्वीकारणे गरजेचे आहे. अशी गांधींची धारणा होती. कारण भारतात आज गरीब-श्रीमंत यांच्या प्रचंड दरी निर्माण झाली आहे. महात्मा गांधी म्हणत आदर्श राज्यत सर्वत्र आर्थिक सुबत्ता असावी. सर्व व्यक्ती स्वावलंबी असावी. हे केव्हा साध्य होईल, तर विश्वस्त विचाराने विश्वस्त संकल्पनेच्या माध्यमातून श्रम आणि भांडवल यांचा संबंध निर्माण करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. संपत्ती ही ईश्वरी देन असल्याने संपत्तीवर सर्वांची मालकी झाली पाहिजे. समाजात अतिरिक्त संपत्ती असलेल्या संपत्तीधारकांनी आपल्याकडील अतिरिक्त संपत्ती समाजासाठी उपयोगात आणून तिचा विश्वस्त म्हणून काम करावे. यामुळे गरिबांच्या मनात श्रीमंताबद्दल द्वेष निर्माण होणार नाही. गरीब श्रीमंत यामधील अंतर कमी होऊन समाजात आर्थिक समानता निर्माण होईल. रामराज्यातील नागरिकांचे संबंध समानतेवर आधारित असतात. जेव्हा समानता ही जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात निर्माण होईल, मानवामध्ये कोणत्याच प्रकारच्या जातीभेद पाळला न जाता गुणक्रमानुसार सर्वांना समान संधीचा उपयोग घेता येईल, तेव्हाच आर्थिक राजकीय व सामाजिक समता देशात निर्माण होईल. कारण सर्वोदय व विश्वस्त हे समतेचे मूलभूत घटक आहेत. भूतलावर जन्मलेला प्रत्येक मानव हा असलेल्या नैसर्गिक संपत्तीचा विश्वस्त आहे. "मालक" नव्हे. गांधी म्हणत "तुम्ही करोडो रुपये खुशाल कमवा. पण लक्षात हे ठेवा की, तुमची संपत्ती ही तुमची नाही. ती लोकांची आहे. तुमच्या न्याय गरजा भागविण्यासाठी तुमच्या संपत्तीतून आवश्यक तेवढेच घ्या पण बाकी शिल्लक संपत्ती समाजासाठी वापरा. म्हणजे समाजातील दीनदुबळया गोर-गरीब लोकांच्या सेवेसाठी तुमच्या बाकीच्या संपत्तीची तुम्ही विश्वस्त व्हा". सर्वांसाठी जगण्यायेवढ्या आवश्यक गरजा पूर्ण करण्याची जबाबदारी ही श्रीमंताची आहे. व ती त्यांनी अंतकरणापासून जोपासली पाहिजे. हा गांधींचा विश्वस्त संकल्पनेच्या पाठीमागील मूळ उद्देश होता. त्यासाठी त्यांनी तहयात प्रयत्न केले. कारण समाजामधील विषमता ही मानवाच्या विकासातील मोठी अडचण आहे. विषमतेमधून असंख्य समस्या निर्माण होतात. एकीकडे श्रीमंताजवळ

आवश्यक व अनावश्यक अशा भरपूर वस्तूंचा मोठा संचय असतो. तर दुसरीकडे जीवनावश्यक वस्तूंच्या अभावामुळे अनेक लोक भुकेने मरतात. खरे म्हणजे उपाशी व्यक्तीला पोटभर अन्न मिळविण्याइतपत आत्मनिर्भर बनविणे हे श्रीमंताचे कर्तव्य आहे. ही जबाबदारी श्रीमंतांनी घ्यावी यासाठी गांधींनी हृदय परिवर्तन करण्यावर भर दिला आहे. सबब! आर्थिक विषमता केवळ दोन मार्गानेच दूर होऊ शकते. एक तर श्रीमंताजवळील संपत्ती हिसकावून घेऊन ती जनकल्याणासाठी वापरणे किंवा श्रीमंत लोकांनी स्वच्छने आपले कर्तव्य समजून आपली संपत्ती जनकल्याणासाठी वापरणे हे होय. कारण जन्मता सर्व व्यक्ती समान असतात, सर्वांना विकासाची समान संधी मिळणे प्रत्येक व्यक्तीचा हक्क आहे. परंतु निसर्गनियमानुसार सर्वांची क्षमता सारखी नसते. काही व्यक्तींना धनसंचय करता येतो, तर काहींना जमत नाही. "समस्त विश्वच माझे घर" या युक्तीप्रमाणे शक्तिशाली, बुद्धीशाली व्यक्तींनी उपकाराची भावना बाळगून संपत्तीचे जतन केले पाहिजे. ज्याप्रमाणे एका कुटुंबामध्ये संपत्ती मिळवणारी सर्वच माणसे नसतात परंतु घरामध्ये येणाऱ्या संपत्तीवर सर्वांचाच हक्क व अधिकार असतो. ती संपत्ती सर्वांवर खर्चही होते. त्याचप्रमाणे श्रीमंताकडे जमा झालेली संपत्ती ही जनकल्याणासाठी गरजवंतासाठी खर्च झाली पाहिजे. असे महात्मा गांधी यांचे मत होते.

महात्मा गांधींनी मानवी जीवनाच्या सामाजिक, आर्थिक धार्मिक, नैतिक, राजनीतिक इत्यादी पैलूंचे अध्ययन करून समाजामध्ये असलेल्या समस्या सोडविण्यासाठी उपाय सुचविले आहे. त्यांनी सुचविलेल्या उपायांमधील विश्वस्तांचा विचार हा शाश्वत विचार आहे. हे आज सिद्ध झालेले दिसून येते. मिळविणे-मिळवत राहणे, हे मानवी स्वभावातच आहे. धनसंचय करणे, अति संपत्तीचा लोभ ही मानवी प्रवृत्ती आहे. इंग्रजांनी जे आपल्यावर राज्य केले त्यामधील सर्वात मोठे कारण म्हणजे भारतीयांमध्ये असलेला कमकुवत हे होय. म्हणून गांधी म्हणत इंग्रजांना भारताबाहेर कसे घालवायची हा मोठा प्रश्न नाही तर आपले आत्मबल कसे वाढवायचे हा यक्ष प्रश्न आहे. स्वार्थी मनोवृत्तीवर केवळ विश्वस्त विचारच विजयी होऊ शकतो. यावर त्यांचा गाड विश्वास होता. सर्व मानव समान आहे. सर्वांना सारखी अवयव आहेत, म्हणून सर्वांच्या आवश्यक गरजा पूर्ण व्हाव्यात. सर्वांना फक्त बोलण्यापुरते विश्वस्त विचार चांगले आहेत हे वाटणे गरजेचे नाही. तर प्रत्येकाने त्या अनुषंगाने आपापली जबाबदारी पार पडली पाहिजे. तेव्हाच शाश्वत विकास होणे शक्य आहे. गांधी म्हणत शाश्वत मूलतत्त्वाची जोपासना करण्यासाठी सर्वांनी विश्वस्तवृत्ती जोपासणारा विचार आत्मसात केला पाहिजे. गीतेमध्ये श्रीकृष्णाने सांगितले आहे की, तुम्ही जन्माला येताना सोबत काहीच आनलेले नाही. आणि अंतिम क्षनालाही तुम्ही काहीच घेऊन जाऊ शकत नाही. म्हणून जगात, समाजात वावरत असताना व्यक्तीची भूमिका ही विश्वस्ताची असली पाहिजे. आपल्याजवळ असलेल्या संपत्तीचे आपण विश्वस्त आहोत. रक्षणकर्ते आहोत, या भावनेतून प्रत्येक व्यक्तीचा व्यवहार असल्यास त्याचा नैतिक विकास होतो. त्यासोबतच राष्ट्राचाही विकास साधतो. विश्वस्तवृत्तीचा अंगीकार जर मोठ्या प्रमाणात झाला, तर समाजातील असंख्य समस्या आपोआप सुटतील. या विचार प्रभावातून महात्मा गांधीची विश्वस्त संकल्पना निर्माण झाल्याची दिसून येते. आर्थिक विषमता, राजकीय असमर्थता दूर करण्यासाठी गांधीजींनी विश्वासाचा सिद्धांत मांडला आहे.

भौतिक दृष्टीने साधे जीवन, स्थानिकरित्या जे उत्पादन होते, त्याच् उपयोगाने गरजा भागविणे. हा गांधींनी मांडलेला व स्वतः आचरणात आणलेला सिद्धांत आहे. गरजा प्रमाणात ठेवणे, त्यामध्ये नेमस्तपणा आणणे, संयमाने वापर करणे, अनावश्यक वस्तूंचा वापर टाळून संपूर्णतेने जीवन जगणे या सिद्धांताचा गांधींनी पुरस्कार केला. अवांछीत लोभ, स्पर्धा, सत्तेची अमर्याद लालसा या गोष्टींना त्यांनी आपल्या जीवनात टाळले. याशिवाय संपत्तीचे आणि सत्तेचे विकेंद्रीकरण होणार नाही, याची त्यांना जाणीव होती. "धनसंचय" आर्थिक विषमतेचे मूळ आहे. म्हणून गांधी म्हणत श्रीमंतांना हिंसेच्या मार्गाने नष्ट न करता भांडवलदारांचा सदुपयोग आणि श्रमिकाला समाधान केवळ विश्वस्त वृत्तीतूनच मिळू शकते. गांधी सत्य, अहिंसा आणि प्रेमाच्या आधारावर समाजाची पूर्ण:रचना करू इच्छित होते. धनिक व्यक्ती आपल्या कौशल्याचा वापर करून संपत्ती मिळवीत असतो. तेव्हा त्याच्या मनाविरुद्ध त्याच्याकडून संपत्ती हिरावून घेणे हे अन्याय, अत्याचारी व अनैतिक आहे. शिवाय हिंसेने श्रीमंतांना नष्ट करता येणार नाही. यासंदर्भात गांधी म्हणत जमीनदार, भांडवलदार, श्रीमंत लोक काळाची पाऊले ओळखून आपली ध्येयधोरणे बदलतील, आणि आपल्या संपत्तीचा उपयोग हे गरिबांच्या कल्याणासाठी करतील. हा आशावाद त्यांना होता. खाजगी आणि वैयक्तिक मालमत्तेचा विचार गांधीजी अध्यात्मिक दृष्टिकोनातून करतात. मार्क्सप्रमाणे शोषण आणि पिळवणूकिला त्यांचा विरोध होता. मूठभर लोकांची मक्तेदारी गांधींना मान्य नव्हती. आर्थिक आणि सामाजिक समतेवर आधारलेली आदर्श समाजाची स्थापना करणे हे गांधीजींचे स्वप्न होते. आर्थिक विषमता नष्ट करण्यासाठी मार्क्सने सांगितलेला क्रांतीचा मार्गही त्यांना मान्य नव्हता. गांधींचा विश्वास रक्तरंजित क्रांतीपेक्षा हृदय परिवर्तनावर होता. म्हणून सर्व विधायक कामे करताना ते सत्य आणि अहिंसात्मक मार्ग सुचविता. भांडवल आणि श्रम या दोन्ही शक्ती बरोबरीच्याच आहेत. त्यांचा वापर हा विकासासाठी व्हावा. हिंसात्मक मार्गाचा वापर करून आदर्श समाजाची स्थापना होणे शक्य नाही, आणि झाली तर ती तात्पुरती वर्करणी असेल कारण त्यास नैतिक अधिष्ठान राहणार नाही. गांधी म्हणत जर व्यक्तीने प्रामाणिकपणे संपत्तीचा विश्वस्त मानले तरच तो त्याचा संपत्तीचा उपयोग समाज कल्याणासाठी करेन, तेव्हा त्या व्यक्तीची मिळकत खऱ्या अर्थाने शुद्ध होईल.

श्रीमंताकडील संपत्ती त्याच्या इच्छेविरुद्ध काढून घेतल्यास ही एक प्रकारची हिंसा होईल. म्हणून हिंसेचा उपयोग न करता भांडवलदारांमध्ये, श्रीमंतांमध्ये मानवतावाद जागृत करावा, हा संदेश गांधी देतात. गांधी म्हणतात प्रथमत: धनिकांना त्यांच्या सामाजिक आणि नैतिक कर्तव्याची जाणीव करून देणे गरजेचे आहे, हे काम सोपी नाही. पण ते जर साध्य झाले तर प्रत्येक धनिक व्यक्ती हा एकाच वेळी संपत्तीचा "स्वामी" असेल आणि समाजात त्याचे स्थान "विश्वस्ताचे" राहील. एखाद्या व्यक्तीला वारसाने, उद्योगातून, व्यवसायातून भरपूर संपत्ती मिळाली असेल, तेव्हा त्याच्यामध्ये जाणीव असावी की, ही संपत्ती माझी नाही. इतरांच्या सहकार्याने, मदतीने ती आली आहे. म्हणून प्रतिष्ठेने, सन्मानाने जगण्यासाठी आवश्यक तेवढीच संपत्ती ठेवावी. अधिक असलेल्या संपत्तीवर समाजाचा हक्क आहे. ती संपत्ती समाजाच्या कल्याणासाठी वापरली पाहिजे. गांधीजी आपल्या संभाषणातून नेहमी व्यक्त होत होते की, जमीनदार, भांडवलदार आणि राजाने लोभ आणि परिग्रह भावनेचा त्याग करावा.

गांधींच्या विश्वस्त संकल्पनेला आर्थिक क्षेत्रामध्ये फार मोठे स्थान आहे. भारतामधील संस्थानिकांकडे, जमीनदारांकडे, जागीरदारांकडे अमाप संपत्ती होती. ही संपत्ती नष्ट करावी असे समाजवादी विचारवंताना वाटत होते. तेव्हा गांधींनी हा मार्ग चुकीचा आहे, हे ठामपणे मांडले. यासंदर्भात गांधी सुचवितात की, श्रीमंतांनी स्वेच्छेने विश्वस्ताच्या नियमांचे पालन करावे. हा गांधींचा विचार आजही शाश्वत विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

समाजाचा "सेवक" व्यक्ती असतो. म्हणून त्याने अतिरिक्त धन समाजाच्या कल्याणासाठी वापरले पाहिजे. गरजा पूर्ण झाल्यानंतर बाकी राहिले ते धन समाजाची "ठेव" म्हणून ठेवले पाहिजे. आणि जे धन समाजाची ठेव आहे, त्याचा उपयोग व्यक्तिगत लाभ, स्वार्थ, चैन, आरामासाठी करू नये. कारण व्यक्ती हा अतिरिक्त धनाचा "संरक्षक", "विश्वस्त" असतो. या विचाराचे संकलन म्हणजे विश्वस्ताचा सिद्धांत होय. गांधींच्या विश्वस्त संकल्पनेचा मुलाधार हा "स्वामी" किंवा "मालक" आणि "संरक्षक" किंवा "विश्वस्त" या कृतीवर आधारलेला आहे. समाजात आर्थिक समानता आणणे व ती कायम टिकविणे हा मूळ उद्देश गांधींचा विश्वस्त संकल्पनेच्या पाठीमागे होता. आर्थिक समानता लोकशाहीचे प्रमुख अंग आहे. अहिंसेवर आधारित लोकशाही अस्तित्वात येण्यासाठी सत्तेचे विकेंद्रीकरण आणि विश्वस्त या दोन योजना अमलात येणे गरजेचे आहे. कारण जोपर्यंत आर्थिक विषमता आहे, तोपर्यंत सत्तेवर नियंत्रण ठेवण्याचे, एकूणच… मानवाचे मूलभूत अधिकार व्यक्तीला उपभोक्ता येणार नाही. धनिकांचे हृदयपरिवर्तन हा एकच मार्ग विश्वस्त संकल्पना समाजात निर्माण होण्यासाठी सहाय्य घटक आहेत. आणि यावरच गांधींनी जीवनभर कार्य केल्याचे दिसून येते.

**सारांश**

काळानुसार अनेक संत-महात्मे, सुधारक व विचारवंत यांची तत्वे व विचार समोर येताना दिसतात. परंतु काळ-वेळ, परिस्थिती बदलली तिथे ते विचार सुद्धा मृत होतात. मात्र गांधीजींच्या विचारातील 'मूल्य' बदलत्या परिस्थितीतही महत्त्वपूर्ण ठरतात. गांधीजींनी आर्थिक क्षेत्रात विकेंद्रीकरणाचा आग्रह धरला होता. आर्थिक विकेंद्रीकरण शक्य व्हावे म्हणून गांधींनी प्रत्येक ग्राम एक आर्थिक व्यवस्थेचे घटक मानले होते. गावातील जनतेच्या अन्न, वस्त्र, निवारा, ज्ञान, मनोरंजन आणि आरोग्य संवर्धन या मूलभूत गरजा भागविणाऱ्या वस्तू व सेवा गावातच निर्माण व्हाव्यात, असा त्यांचा आग्रह होता. यासाठी त्यांनी ग्रामोद्योग, लघुउद्योग, कुटीरउद्योग, हस्तकला या बाबींना अर्थव्यवस्थेत प्राधान्य दिले होते. गांधीजींचा विश्वस्त संकल्पनेवर मोठा विश्वास होता. त्यांच्यामते संपत्तीवर सर्वांचीच मालकी प्रस्थापित झाली पाहिजे. एखाद्या माणसाजवळ जर अतिरिक्त संपत्ती असेल तर त्याचा उपयोग त्या माणसाने समाजाचा विश्वस्त म्हणून करावी. हिंसेने श्रीमंतांना नष्ट करता येणार नाही, तर श्रीमंतांनीच काळाची पावली ओळखून आपली धोरणे बदलावीत व संपत्तीचा उपयोग गरिबांच्या कल्याणासाठी करावा. परंतु आज भारतामध्ये मात्र स्थिती वेगळी आहे. मोठ्या प्रमाणात आर्थिक विषमता दिसून येते. श्रीमंत हा श्रीमंत होत चालला आहे. त्यामुळे देशात दारिद्र्य, बेकारी, भ्रष्टाचार, हिंसा, आतंकवाद, गुंडगिरी यामध्ये वाढ झालेली आहे. या समस्या सोडवायच्या असतील तर गांधीजींनी सांगितल्याप्रमाणे प्रत्येक व्यक्तीने आपल्या गरजा कमी करून आपल्या संपत्तीचा काही भाग गरिबांच्या कल्याणासाठी खर्च केला पाहिजे.

तरच समाजाचा, राष्ट्राचा शाश्वत साध्य करता येईल, नसता आज ज्या समस्या फोफावत आहेत त्याचे स्वरूप आक्राळ-विक्राळ झाल्याशिवाय राहणार नाही.

**संदर्भ सूची:**

१. लीमय. मधू, (1998), राष्ट्रपिता, मुंबई: ग्रंथाली इंडियन एज्युकेशन सोसायटी.

२. महात्मा गांधी, कुमाराप्पा भारतन, (सपा). (1958), नई तालीम की और, अहमदाबाद: नवजीवन प्रकाशन मंदिर.

३. चौसाळकर अशोक, (2008), हिंद स्वराज्य आणि आत्मबळाची प्राप्ती, कोल्हापूर: महात्मा गांधी अभ्यास केंद्र शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

४. सूर वासंती, (2010), 21 व्या शतकात गांधी, पवनार: परमधाम प्रकाशन.

५. भारदे बाळासाहेब, (1993), गांधी विचार मीमांसा, पुणे: महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन.

६. रमेश सक्सेना, (2009), गांधी एक अध्ययन, नई दिल्ली: विश्वभारती पब्लिकेशन.

७. गोखले दो. न., (1996), मानव नि महामानव, मुंबई: मौज प्रकाशन.

८. महात्मा गांधी, माझ्या स्वप्नांचा भारत, (संक्षिप्त), पवणार: परमधाम प्रकाशन, पाचवी आवृत्ती.

९. नलिनी पंडित, (1983), गांधी, ग्रंथाली प्रकाशन.

१०. कांतीभाई शहा, (१९८८), गांधी जसे पाहिले-जाणले विनोबांनी, पवनार: परमधाम प्रकाशन.